# शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

जलंब रोड, खामगाव – ४४४३०३, जि. बुलढाणा (महाराष्ट्र)

दूरध्वनी: ०७२६३-२५६६४४ (प्राचार्य)
०७२६३-२५२२७८ (कार्यालय)

ई-मेल: office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in
संकेतस्थळ: www.gpk.edu.in

क्रशातंनिखा./केंद्रीय भांडार/लिलावसूचना/२०२६/454 दि. 04/03/2026

## निर्लेखित साहित्यांच्या विक्रिबाबत निविदा सूचना

१. शासकीय तंत्र निकेतन खामगाव, या संस्थेतील विविध विभागांमधील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी/कालबाह्य/निर्लेखित झालेल्या यंत्र सामुग्री, उपकरणे इत्यादि साहित्यांच्या अंतिम विल्हेवाटीसाठी लिलावा प्रक्रिया द्वारे विक्री करणे आहे.

२. सदर साहित्य हे **"आहे तशा अवस्थेत, जेथे आहे तेथून"** या तत्वावर **"जास्तीत जास्त किमती मध्ये"** विक्री करावयाचे आहे.

३. निर्लेखित साहित्यांची खरेदी करण्यास इच्छूक खरेदीदार/भंगार व्यावसायिक/कंत्राटदार/ठेकेदार यांचे कडून **सीलबंद लिफाफ्या मध्ये निविदा (प्रपत्र-अ)** मागविण्यात येत आहेत.

४. इच्छूक खरेदीदार/भंगार व्यावसायिक/कंत्राटदार/ठेकेदार यांना **दि. ०५/०३/२०२६ ते दि. १६/०३/२०२६ या कालावधी दरम्यान** (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून सदर साहित्यांची प्रत्यक्षरीत्या पाहणी करता येईल.

५. सदर साहित्यांच्या खरेदी करीता **निविदा शुल्क (ना-परतावा) रु. ५००/- (रू. पाचशे फक्त)** भरणे आवश्यक आहे.

६. तसेच "प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव" यांचे नावे **रु. ५,०००/- (रू. पाच हजार फक्त) चा राष्ट्रीयीकृत बँकेचा डीमांड ड्राफ्ट अनामत रक्कम** म्हणून निविदा धारकास जमा करावा लागेल.

७. निविदा फॉर्म (प्रपत्र-अ), अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट आणि आवश्यक कागदपत्रे **सीलबंद लिफाफ्या मध्ये या कार्यालयात दि. १६/०३/२०२६ रोजी संध्याकाळी ५:०० वाजे पर्यंत** जमा करावी. उशिराने आलेल्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही.

८. प्राप्त झालेल्या निविदा ह्या **दि. १७/०३/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता** उपस्थित निविदा धारक तसेच समिती सदस्य यांच्या उपस्थितित उघडण्यात येईल.

९. निर्लेखित साहित्यांच्या विक्रिबाबत अटी व शर्ती या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.gpk.edu.in) तसेच मुख्य सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

4/3.

(डॉ. एस. एस. प्रभुणे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

संदर्भ: क्र.शातंनिखा/केंद्रीय भांडार/लिलावसूचना/२०२६/454 दि. 04/03/2026

## निर्लेखित साहित्यांच्या विक्रिबाबत अटी व शर्ती

१. शासकीय तंत्र निकेतन खामगाव, या संस्थेतील जडवस्तू संग्रहातील निरुपयोगी/कालबाह्य/निर्लेखित झालेल्या यंत्र सामुग्री, उपकरणे इत्यादि साहित्यांची **"आहे तशा अवस्थेत, जेथे आहे तेथून, स्वखर्चाने नेणे"** या तत्वावर **"जास्तीत जास्त किमती मध्ये"** विक्री करावयाचे आहे.

२. इच्छूक खरेदीदार/भंगार व्यावसायिक/कंत्राटदार/ठेकेदार यांनी एकत्रित संपूर्ण Lot (लॉट) करीता निविदा फॉर्म (प्रपत्र-अ) मध्ये नमूद **शासकीय किंमतीपेक्षा जास्त किंमत** नमूद करणे आवश्यक आहे. तसेच नमूद खरेदी किंमतीच्या **अतिरिक्त १८% GST चा वेगळा भरणा** संबंधित खरेदीदारास करावा लागेल.

३. इच्छूक खरेदीदार/भंगार व्यावसायिक/कंत्राटदार/ठेकेदार यांनी **दि. ०५/०३/२०२६ पासून दि. १६/०३/२०२६ पर्यंत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत** सदर साहित्य प्रत्यक्षरीत्या पाहणी करून घ्यावयाची आहे.

४. इच्छूक खरेदीदार यांना लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी त्यांचे Aadhar Card, Pan Card, GST Registration Certificate, Shop Act License Certificate, व या प्रक्रियेस आवश्यक ती ईतर सर्व कागदपत्रे यांची Xerox प्रत (स्वयं साक्षांकित Self Attested) निविदेसोबत जमा करणे आवश्यक आहे.

५. **निविदा शुल्क (ना-परतावा) रु. ५००/- (रू. पाचशे फक्त)** भरल्या नंतर निविदा फॉर्म (प्रपत्र-अ) संबंधित खरेदीदारास उपलब्ध करून देण्यात येईल.

६. लिलाव प्रक्रियेत सहभाग नोंदविण्यासाठी खरेदीदारास **अनामत रक्कम (परतावा होणारी) रु. ५,०००/- (रू. पाच हजार) हि डिमांड ड्राफ्ट (नावे: प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव)** द्वारे भरणे आवश्यक आहे.

७. संबंधित खरेदीदाराने निविदा फॉर्म (प्रपत्र-अ), अनामत रक्कम (Original डिमांड ड्राफ्ट) आणि सर्व संबंधित कागदपत्रे एकत्र करून **सिलबंद लिफाफ्या मध्ये या कार्यालयात दि. १६/०३/२०२६ रोजी संध्याकाळी ५:००** वाजेपर्यंत जमा करणे आवश्यक आहे. उशिराने प्राप्त झालेल्या निविदांचा विचार करण्यात येणार नाही.

८. इच्छूक खरेदीदार यांनी निविदा फॉर्म (प्रपत्र-अ) मध्ये साहित्यांच्या **खरेदीची किंमत हि शासकीय किंमतीपेक्षा जास्त** नमूद करावी. नमूद खरेदी किंमतीच्या **अतिरिक्त १८% GST चा वेगळा भरणा** संबंधित खरेदीदारास करावा लागेल. सर्वात जास्त किंमत असणाऱ्या निविदेस साहित्यांच्या विक्री चे आदेश निर्गमित करण्यात येईल.

९. विक्री आदेश निर्गमित झाल्यानंतर २ दिवसांच्याआत रक्कम हि कार्यालयात RTGS/NEFT द्वारे जमा करणे बंधनकारक असेल.

१०. खरेदीची रक्कम प्राप्त झाल्या नंतरच सदर साहित्य नेण्याची परवानगी खरेदीदारास देण्यात येईल. विहित कालमर्यादेत स्वखर्चाने साहित्य घेऊन जाण्याची संपूर्ण जबाबदारी हि संबंधित खरेदी दाराची असेल.

११. ज्या खरेदी दाराची निविदा मंजूर होणार नाही अशा खरेदी दारांची अनामत रक्कम संपूर्ण प्रक्रिया झाल्यानंतर, त्यांना कळविल्यानुसार विहित वेळेत परत करण्यात येईल.

१२. निविदेबाबत खरेदी दारांकडून कोणत्याही प्रकारची अट स्वीकारली जाणार नाही. तसेच तांत्रिक कारणास्तव साहित्य विकण्याचा अथवा न विकण्याचा अंतिम निर्णय हा या कार्यालयाचा राहील.

१३. कोणतेही कारण न देता निविदा मंजूर किंवा नामंजूर करण्याचा हक्क हा या कार्यालयाचा राहील.

१४. निविदे प्रक्रिये दरम्यान काही बदल झाल्यास त्याबाबत सूचना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर आणि मुख्य सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१५. साहित्य घेऊन जाताना संस्थेमधील विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी यांना त्रास होणार नाही याची खबरदारी संबंधित खरेदीदाराने घेणे आवश्यक आहे. तसेच संस्थेची मालमत्ता, इमारत यांचे नुकसान होणार नाही याकडे लक्ष देणे बंधनकारक असेल. काही नुकसान झाल्यास त्याची वसूली संबंधित खरेदीदाराकडून करण्यात येईल.

१६. संपूर्ण निविदे प्रक्रियेचे न्यायिक क्षेत्र "खामगाव" असेल.

- ✓ **निविदा भरण्याचा कालावधी:**
    - ○ **दि. ०५/०३/२०२६ ते दि. १६/०३/२०२६ रोजी** संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत

(डॉ. एस. एस. प्रभुणे)

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव

प्रत:

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना महितीस्तव आणि संकेतस्थळावर प्रसिद्धी साठी

२. मा. सहसंचालक, विभागीय कार्यालय तंत्रशिक्षण, अमरावती यांना महितीस्तव आणि संकेतस्थळावर प्रसिद्धी साठी

३. मा. जिल्हा माहिती अधिकारी, बुलढाणा यांना माहितीस्तव

४. सर्व विभाग प्रमुख/ नियंत्रक, शा. तं. नि. खामगाव यांना कळविण्यात येते की, अंतिम विल्हेवाटी करीता साहित्य विभागामध्ये वेगळे ठेवून त्यावर "Proposed For Auction" असे ठळक अक्षरात नमूद करावे

५. अध्यक्ष, साहित्य निर्लेखन समिती, शा. तं. नि. खामगाव यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता

५. भांडारपाल, केंद्रीय भांडार, शा. तं. नि. खामगाव माहिती व आवश्यक कार्यवाही करीता

६. प्रोग्रामर, शा. तं. नि. खामगाव संकेतस्थळावर प्रसिद्धी साठी

७. रोखपाल (मार्फत प्रबंधक), शा. तं. नि. खामगाव माहिती व आवश्यक कार्यवाहि करीता